# दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लि; आष्टा.

ता. वाळवा, जि. सांगली. फोन : ०२३४२-२४३७४० ते ४३ फॅक्स : २४३७४२

## सायबर सिक्युरिटी बाबत घ्यावयाची दक्षता

इलेक्ट्रिक माध्यमांचा वापर हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. देशामध्ये डिजिटल बँकिंग चा वापर वाढत आहे. त्याचबरोबर त्यामधील धोके पण वाढत आहेत. योग्य ती दक्षता घेऊन आपण हे धोके टाळू शकतो .

### मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन वापरताना घ्यावयाची काळजी

१. आपले युजर आयडी व पासवर्ड कोणासही शेअर करू नये.

२. आपले मोबाईल बँकिंग चा पासवर्ड ठराविक कालावधीने बदलावे.

३. पासवर्ड निवडताना कठीण पासवर्ड ठेवावा, पासवर्ड साठी आपली किंवा आपल्या नातेवाईक मित्र अशा कोणाची माहिती वापरू नका.

४. मोबाईल बँकिंग मधून आलेले ओटीपी कोणासही शेअर करू नका.

५. ट्रान्झॅक्शन पीन कोणासही शेअर नका व ट्रान्झॅक्शन पीन ठराविक कालावधीने बदलावे.

६. मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन लॉगिन करण्यासाठी मल्टि फॅक्टर ऑथेंटिकेशन चा वापर करा.

७. ज्यावेळी आपल्याला ट्रान्झॅक्शन अथवा मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन वापरावयाचे नसेल तर ट्रान्झॅक्शन बंद करून ठेवावे.

८. आपल्या मोबाईल वर ट्रस्टेड अँप्लिकेशन इन्स्टॉल करावे.

९. आपल्या मोबाईल वर अँटीव्हायरस चा वापर करावे.

१०. अज्ञात व्यक्ती किंवा वेबसाईट वरून आलेले दूरध्वनी कॉल अथवा ईमेल वरून आलेले कोणतेही मोबाईल अँप्लिकेशन डाउनलोड करू नका.

११. एसएमएस, ईमेल, सोशल अँप वरून आलेले कोणतेही लिंक वर क्लीक करू नका.

१२. सार्वजनिक वायफाय चे वापर शयक्यतो टाळावेत.

१३. मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन व एटीएम कार्ड इंटरनेट बँकिंग इ . चे पासवर्ड किंवा पीन ओटीपी इ. कोणालाही ईमेल अथवा कोणत्याही इतर स्त्रोताद्वारे पाठवू नये.

१४. तुमचा पासवर्ड अथवा पीन ओटीपी इ.सार्वजनिक ठिकाणी मोठयाने बोलू नका जिथे लोक तुम्हाला ऐकू शकतील.

१५. आपण केलेल्या ट्रान्झॅक्शन चे खात्री काही अंतराने अकाउंट स्टेटमेंट मधून करून घ्यावी तसेच काही विसंगती आढळल्यास त्वरीत बँकेस कळवा.